# प्रेसनोट

दि.०३/१२/२०२१

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय पुणे येथील दोन लिपिकांवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम — ७, १२. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४५ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक — (१) तानाजी गोविंदराव दबडे, वय - ५० वर्षे,<br>पद - कनिष्ठ लिपिक, अधीक्षक अभियंता,महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय मध्यवर्ती इमारत पुणे.<br>(२) विलास दगडू तिकोणे, वय - ५० वर्षे.<br>पद - प्रथम लिपिक, कार्यकारी अभियंता कार्यालय महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, विभाग क्रमांक १ पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | २५,०००/- (पंचवीस हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | १५,०००/- (पंधरा हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ०३/१२/२०२१

ठिकाणः- महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालय, मध्यवर्ती इमारत पुणे.

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचा मुलगा इंजिनियर असून त्याचे सुशिक्षीत बेरोजगार इंजिनियरचे शासकीय लायसन्सचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयास पाठविण्यासाठी आरोपी क्रमांक २ यानी १५,०००/- रूपये लाच घेतली व महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाच्या वरिष्ठ कार्यालयात गेल्यानंतर वरील आरोपी लोकसेवक क्रमांक १ यानी लायसन्सचा प्रस्ताव मंजुरीस ठेवण्यासाठी तक्रारदारांकडे २५,०००/- रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता आरोपी लोकसेवक क्रमांक १ याने अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांचेकडे प्रस्ताव मंजुरीस ठेवण्यासाठी सुरूवातीस २५,०००/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १५,०००/- हजार रूपये मागणी करून स्वीकारले.

आरोपी लोकसेवक क्रमांक २ यानी या लाच मागणीस साहाय्य केले. दोघांना ताब्यात घेण्यात आले असून बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रीया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक संदीप व-हाडे हे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. अ‍ॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अ‍ॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन अ‍ॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.